# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या काशिमीरा येथील स्मशानभूमी मध्ये अंतिम क्रिया करण्यासाठी अपुरा कर्मचारीवर्ग असल्याबाबत

**(१) ५७ (१७-०४-२०२५) अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या काशीमीरा येथे असलेल्या स्मशानभूमीमध्ये एका पाळीमध्ये एकच कर्मचारी उपलब्ध असल्याने अंतिम क्रिया करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेकडे याबाबत तक्रार करूनही या समस्येकडे दुर्लक्ष केले जात असून काशीमीरा येथे स्मशानभूमीत अतिरिक्त कर्मचारी वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दिनांक ०१ एप्रिल, २०२५ पासून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून काशिमिरा स्मशान भुमिमध्ये दैनंदिन साफसफाई तसेच प्रेत दहन करणे कामी नागरीकांची गैरसोय होऊ नये याकरीता तीन पाळीमध्ये एकूण ०५ कामगार नियुक्त करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणेबाबत

**(२) ३७९ (२४-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेरोजगाराना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने तसेच बँकांचे आर्थिक सहाय्य मिळत नसल्याने बेरोजगार युवकांची संख्या सुमारे ६५ लाख इतकी असल्याचे उद्योजकता विभागाकडून करण्यात आलेल्या नोंदीनुसार माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेबर फोर्सच्या सर्व्हेनुसार बेरोजगारीचा दर दिवसेंदिवस वाढत असून सन २०२४ च्या अखेरीस तो दर ७.६ वर गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन बेरोजगारी निर्मूलन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१२-०३-२०२६) :** (१) सन १९७० पासून राज्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांची सेवायोजन कार्यालयांत भौतिक (Physical) पध्दतीने नोंदणी करण्यात येत होती. सन २०१३ पासून सदर उमेदवारांची नोंदणी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या "महास्वयं" पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केली जाते. सन २०१३ पूर्वी भौतिक (Physical) पध्दतीने नोंदणी केलेल्या उमेदवारांची माहिती "महास्वयं" पोर्टलवर समाविष्ट करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर पोर्टलवर उपलब्ध असलेली आकडेवारी नोकरी इच्छुक उमेदवारांची नोंदणी सुरु झाल्यापासूनची एकत्रित (Cumulative) आहे.
(२) हे खरे नाही.

Periodic Labour Force Survey, २०२४ नुसार महाराष्ट्रातील बेरोजगारीचा दर सन २०१७-१८ मधील ४.८ टक्के वरुन सन २०२३-२४ मध्ये ३.३ टक्के इतका कमी झाला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (जि.नागपूर) प्राचार्य व शिक्षकांविरुध्द विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीबाबत

**(३) ३९३ (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर (जि.नागपूर) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचे मानसिक त्रास देऊन भविष्य उध्वस्त करु पाहणाऱ्या प्राचार्य, शिक्षकांवर योग्य कारवाई करावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांना तहसिलदार यांच्यामार्फत केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावनेर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करु पाहणाऱ्या प्राचार्य व शिक्षकांवर केलेल्या तक्रारीच्या अनुषांगाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१) ते (३) सावनेर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील श्री.हेमंत ढबाले, तासिका शिल्पनिदेशक व कुमारी मोना रंगारी, तासिका निदेशक ऍम्प्लायबिलिटी स्किल्स् या दोघांनी गैरवर्तवणूक केल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी दिनांक २०/०३/२०२४ रोजी संबंधित प्राचार्यांकडे केली होती. त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली आणि सदरहू चौकशीमध्ये उपरोक्त दोन तासिका निदेशकांनी गैरवर्तणूक/कर्तव्यात कसूर/ शिस्तभंग केल्याचे सिध्द झाले. त्यानुषंगाने श्री.हेमंत ढबाळे व कुमारी मोना रंगारी या दोघांच्या तासिका तत्वावरील सेवा दिनांक ३१/१२/२०२४ पासून संपुष्ठात आणल्या आहेत. सदरहू चौकशी समितीच्या अहवालानुसार प्राचार्य, सावनेर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याबाबत कोणतीही तक्रार आढळून आलेली नाही.

---

## शासकीय व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या अस्थायी सेवेबाबत

**(४) ७३१ (२४-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आय.टी.आय. मध्ये दिनांक ८ मार्च, १९९९ च्या शासन निर्णयानुसार स्थायी झालेल्या "अ" वर्गातील कर्मचाऱ्यांना अस्थायी काळातील सेवेचे लाभ देण्याबाबत दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(२) असल्यास, कौशल्य विकास विभागाने सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित आदेश निर्गमित केले आहेत काय, सदर आदेश अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०३-२०२६) :** (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील गट-अ वर्गातील अधिकाऱ्यांचा समावेश दिनांक ०८/०३/१९९९ च्या शासन निर्णयामध्ये नाही. त्यामुळे गट-अ वर्गातील अधिकाऱ्यांच्या बाबतीत दिनांक १६/०८/२०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार कार्यवाही करणे प्रलंबित नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आय.टी.आय. कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन नियमीत करण्याबाबत

**(५) ७३२ (२४-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील आय.टी.आय. मध्ये अल्पसंख्यांक योजना, आदिवासी सार्वत्रिकरण योजना, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजनेतंर्गत कर्मचाऱ्यांचे वेतन हे मागील ५-६ महिन्यांपासून झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील आय.टी.आय.मध्ये अल्पसंख्यांक योजना, आदिवासी सार्वत्रिकरण योजना, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजनेतंर्गत

कर्मचाऱ्यांचे वेतन केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांचे जानेवारी, २०२५ मध्ये वेतन अदा करणे बाकी होते. सदर कर्मचाऱ्यांचे वेतन विलंबाने अदा करण्यात आलेले आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांचे वेतन जानेवारी, २०२५ मध्ये प्रलंबित नाही.
(२) आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत अल्पसंख्यांक विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य व आदिवासी विकास विभागाच्या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांचे जानेवारी, २०२६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(३) व (४) उक्त योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे अदा करण्याकरीता नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे तसेच आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाकरीता क्षेत्रिय प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे संबंधित जिल्ह्यातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## सोलापूर जिल्ह्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयांतील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) ९७१ (२४-०४-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित ११४ पैकी ६८ उच्च महाविद्यालयांना पूर्णवेळ प्राचार्य नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोस्टर तपासणी न झालेले किंवा शिक्षक भरती झाली नसल्याने अनेक महाविद्यालयात पूर्णवेळ प्राचार्य नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षक भरती करुन पूर्णवेळ प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयापैकी केवळ २३ अनुदानित महाविद्यालये व ३३ विना-अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांची पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

प्राचार्य पद हे एकाकी पद आहे, व आरक्षण अधिनियम २००१ च्या कलम ३ (१)(घ) नुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. सबब, प्राचार्य या एकाकी पदाची बिंदुनामावली तपासणी करुन आरक्षण निश्चिती करण्याची आवश्यकता नाही.

(३) शासन परिपत्रक दिनांक २३/०३/२०२१ व शासन निर्णय दिनांक १२/११/२०२१ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य पदभरतीसाठी मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काळाचौकी येथील अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी विकासकांकडून प्रतिसाद मिळाला नसल्याबाबत

**(७) १००६ (१७-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळा चौकी येथील अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या निविदेला तिसऱ्यांदा मुदतवाढ देऊनही विकासकांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे आता निविदेला चौथ्यांदा मुदतवाढ देण्याची वेळ मुंबई मंडळावर आली असून त्यानुसार सदरहू निविदेला दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला विकासकांकडून प्रतिसाद न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त वसाहतीचा पुनर्विकास तातडीने होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाच्या निविदापूर्व बैठकांदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांनुसार व निविदेतील अटी व शर्ती विचारात घेऊन निविदेस प्रतिसाद मिळाला नसण्याची शक्यता आहे.

(३) सदर प्रकल्पाविषयी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/०४/२०२५ रोजी संयुक्त बैठक पार पडली. सदर बैठकीअंती झालेल्या निर्णयांनुसार सुधारित निविदा दिनांक २९/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमनेर (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) नगरपरिषदेने शहरात तयार केलेल्या व्हर्टिकल गार्डनची दुरवस्था झाल्याबाबत

**(८) १३४८ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर नगरपरिषदेने (ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर) सन २०२१ पासून शहरात विविध ठिकाणी बाग

(व्हर्टिकल गार्डन) तयार केली, परंतु सदर बागेची देखभाल होत नसल्यामुळे दुरवस्था झाली असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास सदर बागेच्या (व्हर्टिकल गार्डनच्या) कुंड्यांमध्ये माती, रोपे नसल्यामुळे येथील बागेची (व्हर्टिकल गार्डनची) दुरवस्था झाली असून ती दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे,

संगमनेर नगरपरिषद हद्दीतील चार ठिकाणी उभारण्यात आलेल्या व्हर्टीकल गार्डनच्या देखभाली अभावी काही प्रमाणात रोपांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे.
सद्य:स्थितीत सर्व चारही ठिकाणच्या व्हर्टीकल गार्डनची संपूर्ण दुरुस्ती पूर्ण करण्यात आली असून, नुकसान झालेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे लावण्यात आली आहेत.
(२) सदर प्रकरणी नगरपरिषदेच्या वृक्ष विभागामार्फत पाहणी करण्यात आली असून, या त्रुटी दूर करण्यासाठी खालील आवश्यक उपाययोजना करण्यात आली आहे.
१) सर्व चारही व्हर्टिकल गार्डनची पुनर्रचना व पुनर्बांधणी करण्यात आली आहे.
२) सर्व कुंड्यांत नव्या रोपांची लागवड पूर्ण झाली आहे.
३) नियमित पाणीपुरवठा, देखभाल व सफाईसाठी तांत्रिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.
४) वृक्षारोपण व उद्यान विभागामार्फत सजग देखरेख यंत्रणा कार्यरत असून, विद्युत प्रणालीही पूर्ण कार्यक्षम आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर नगरपरिषदेच्या (जि.बुलढाणा) हद्दवाढीच्या प्रस्तावाबाबत

**(९) १५७३ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर नगरपरिषदेचा (जि.बुलढाणा) हद्दवाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) मलकापूर नगरपरिषदेचा (जि.बुलढाणा) हद्दवाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) ते दिग्रज (जि.वर्धा) हा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याबाबत

**(१०) १७५५ (१७-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रस्तावित असलेला कोल्हापूर जिल्ह्यातून जाणारा शक्तीपीठ हा महामार्ग वगळण्यात आल्याबाबतची अधिसूचना दिनांक १५ ऑक्टोबर,२०२४ रोजी वा त्यासुमारास जाहीर करण्यात आली असून दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत या महामार्गाचे काम सुरु करावे, असे निर्देश शासनाने दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पवनार पत्रादेवी (नागपूर- गोवा) मार्गावर शक्तिपीठ महामार्ग तयार करण्याचे घोषित केले असून या शक्तिपीठ महामार्गामध्ये हिंगोली जिल्ह्यातील वसमत आणि कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पत्रादेवीपर्यंतचा ‘शक्तीपीठ’ महामार्ग १२ जिल्ह्यातून जाणार असून या महामार्गासाठी हजारो हेक्टर पिकाऊ जमीन संपादित केली जाणार असल्यामुळे कोल्हापूरसह लातूर, बार्शी,परभणी,नांदेड, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ‘शक्तीपीठ’ महामार्गाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील शेती पूर्णत: पाण्याखाली असल्यामुळे येथील शेतकऱ्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होत असून त्यामुळे हा महामार्ग कायमस्वरुपी रद्द करावा, अशी मागणी येथील शेतकरी बांधव करीत असून शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सदर शक्तीपीठ महामार्ग रद्द करणे बाबत धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील संघटना सदर निदेशामुळे आक्रमक झाली असून हा महामार्ग रद्द न झाल्यास आत्मक्लेश आंदोलन करण्याचा इशाराही शेतकरी संघर्ष समितीने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पत्रादेवी, (जि.सिंधुदूर्ग) ते दिग्रज, (जि.वर्धा) हा १२ जिल्ह्यातून जाणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्याकरीता नियोजीत शक्तिपीठ महामार्गाची कलम-३ व कलम-१५(२) ची अधिसूचना दिनांक १५/१०/२०२४ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

संबंधित जिल्हयांत प्रस्तुत महामार्गाच्या संयुक्त मोजणीसाठी शेतकऱ्यांनी काही प्रमाणात विरोध केलेला आहे. मात्र काही प्रमाणात संमती दिल्याने संयुक्त मोजणी प्रक्रिया सुरु आहे.

(४) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत प्रस्तावित महामार्गासाठी भूसंपादन करण्यासाठी संयुक्त मोजणी प्रक्रिया सुरु आहे. संयुक्त मोजणी पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष किती बागायती क्षेत्रामधून प्रस्तावित रस्ता जात आहे. याबाबत निश्चितता येईल व त्याअनुषंगाने शेतकऱ्यांना संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मोबदला अदा करण्यात येईल.

माहे जानेवारी, २०२५ व त्यानंतर काही शेतकऱ्यांनी व संघटनांनी महामार्ग रद्द करण्याबाबत आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते. मात्र भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन संबंधीतांच्या मोबदलाविषयक व इतर बाबींचे निरसन केले जात आहे.

(५) महामार्गाकरीता जमिनी देण्यास विरोध दर्शविणारी निवेदने प्राप्त झालेली आहेत. नांदेड, बीड, लातूर व धाराशिव येथे संयुक्त मोजणीकरीता शेतकऱ्यांनी काही प्रमाणात विरोध करत प्रथमत: संयुक्त मोजणी होऊ दिली नाही. मात्र सद्य:स्थितीत वर्धा व सिंधुदूर्ग जिल्ह्यात मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. बीड, धाराशिव, यवतमाळ तसेच सोलापूर जिल्ह्यातील काही गावात संयुक्त मोजणी प्रक्रिया सुरु आहे.

(६) शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन तसेच, प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येत आहे व सदर प्रकल्पांच्या भसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे/भूधारकांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने शासनामार्फत उचित कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाच्या स्तरावर वैयक्तिक लाभाची प्रकरणे प्रलंबित असल्यबाबत

**(११) २१७० (२४-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाच्या स्तरावर अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वैयक्तिक लाभांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालनालयाच्या दिनांक २७ डिसेंबर, २०२४ व १ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ अखेर विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण कार्यालयाच्या स्तरावर सर्व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा विभागीय सहसंचालकांना दिनांक १५ जानेवारी, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांनी माहे जानेवारी,२०२५ मध्ये प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक लाभाची प्रकरणे प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढण्याबाबत प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी काढलेल्या पत्रकानुसार अदयाप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक लाभांची प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१६-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ३१/१२/२०२४ अखेरपर्यंत विभागीय कार्यालयांचे स्तरावर एकूण ४१८६ इतकी प्रकरणे प्रलंबित होती. सदरहू राज्यव्यापी मोहिमेमध्ये दिनांक २५ जानेवारी, २०२५ पर्यंत एकूण ३११७ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. विभागीय सहसंचालक कार्यालयामध्ये दिनांक २५जानेवारी, २०२५ पर्यंत काही प्रकरणे प्रलंबित राहील्याचे निदर्शनास आल्यामुळे, संचालनालयाच्या दिनांक २८/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व प्रलंबित प्रकरणे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत निकाली काढणेबाबत संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांना निर्देश देण्यात आलेले होते.

(४) प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी राज्यव्यापी मोहिम सुरु करण्यात आली. यामध्ये दैनंदिन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला व आवश्यकतेनुसार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीदेखील कार्यालये सुरु ठेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

दिलेल्या निर्देशानुसार सदरहू मोहिम योग्य पध्दतीने सुरु आहे किंवा कसे, याबाबत खातरजमा करण्यासाठी वेळोवेळी बैठका आयोजित करुन कार्यालयीन कामकाजाची तपासणी करण्यात आली. सदरहू राज्यव्यापी मोहिमेमुळे दिनांक ३१/१२/२०२४ अखेरपर्यंत विभागीय कार्यालयांचे स्तरावर प्रलंबित असलेल्या एकूण ४१८६ प्रकरणांपैकी दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत एकूण ४१८५ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. सदरहू कामकाज गतिमान व पारदर्शक होण्याकरीता शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करण्यात आला.

(५) लागू नाही.

---

## राज्यात बॉक्सिंग खेळाला प्रोत्साहन देण्याबाबत

**(१२) २३९२ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विभागीय स्तरावर बॉक्सिंग केंद्रे नसल्यामुळे ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना योग्य प्रशिक्षण आणि सुविधा मिळत नाहीत, परिणामी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यातील बॉक्सिंग खेळाडूंची संख्या कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बॉक्सिंग केंद्रांच्या अभावामुळे अनेक खेळाडू इतर राज्यांमध्ये किंवा खासगी प्रशिक्षण संस्थांमध्ये जात असल्यामुळे क्रीडा विकासावर नकारात्मक परिणाम होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बॉक्सिंग खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी ८ विभागीय बॉक्सिंग केंद्रे उभारण्याची आवश्यकता असून याबाबत बॉक्सिंग असोसिएशनने वेळोवेळी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बॉक्सिंग खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी विभागीय बॉक्सिंग केंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच बॉक्सिंगला प्रोत्साहन देण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी व खेळाडू तयार करुन आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत ?

**श्री.अजित पवार (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र व खेलो इंडिया केंद्रांच्या माध्यमातून जिल्हास्तरावर बॉक्सिंग क्रीडा प्रकाराचे नियमीत प्रशिक्षण दिले जात आहे. त्याच प्रमाणे मिशन लक्ष्यवेध या योजनेंतर्गत बॉक्सिंग क्रीडा प्रकाराचे जिल्हास्तरावर १५ क्रीडा प्रतिभा विकास केंद्र, विभागस्तरावर ०५ क्रीडा निपुणता केंद्र राज्यस्तरावर ०१ हाय परफॉर्मन्स सेंटर आगामी काळात कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मिशन लक्ष्यवेध या योजनेंतर्गत सद्य:स्थितीत, ०६ क्रीडा प्रकारांच्या हाय परफॉर्मन्स सेंटरची स्थापना झालेली असून बॉक्सिंग क्रीडा प्रकाराचे हाय परफॉर्मन्स सेंटर पुणे येथे स्थापन करण्याचे विचाराधिन आहे. या माध्यमातून खेळाडूंना राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षकांच्या माध्यमातुन प्रशिक्षण, क्रीडा वैद्यकशास्त्र तज्ञांचे मार्गदर्शन, राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेस सहकार्य, परदेशी प्रशिक्षणासाठी सहकार्य, उच्च दर्जाची निवास व पुरक आहार इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

---

## कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(१३) २५२२ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक (जि.नागपूर) हे शासनाने सन १९९७ मध्ये स्थापन केलेले भाषिक विद्यापीठ असून, या विद्यापीठाला ३५० महाविद्यालय संलग्नित असून विद्यार्थी संख्या १ लाखांच्या वर गेली असूनही एकही महाविद्यालय अनुदानित नसल्याचे तसेच या विद्यापीठात सिनेटची तरतूद नसल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची गुणवत्ता व दर्जा वाढावा यासाठी या महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत तसेच विद्यापीठात सिनेट सभागृहाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१४-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना सन १९९७ मध्ये संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत राज्यात कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नित एकूण ४०२ महाविद्यालये आहेत. या संलग्न महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या सध्या १ लाखाच्या वर आहे.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सदर महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता प्राप्त असल्याने, या ४०२ संलग्नित महाविद्यालयांपैकी एकही महाविद्यालय अनुदानित नाही.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ अधिनियम, १९९७ मध्ये सदर विद्यापीठामध्ये सिनेट स्थापन करण्यासंबंधी कोणतीही तरतुद विहित केलेली नाही.

(२) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या संलग्नित महाविद्यालयांचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी सध्या विश्वविद्यालयाद्वारे महाविद्यालयांचे शैक्षणिक अंकेक्षण २F, १२B, व NAAC करणे बंधनकारक केले आहे.

दिनांक १७/०५/२००१ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती व दिनांक २४/११/२००१ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय विचारात घेऊन सन २००१ पासून नवीन महाविद्यालये / विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकड्या यांना कायम स्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याचे धोरण अवलंबविण्यात येत आहे. सदर धोरण अद्यापी कायम आहे. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठामध्ये सिनेट सभागृहाची निर्मिती करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील आय.टी.आय.मध्ये अल्पसंख्याक आणि इतर योजनांतील कर्मचाऱ्यांचे वेतन नियमीत करण्याबाबत

**(१४) ३२७४ (१८-०७-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील आय.टी.आय.मध्ये अल्पसंख्यांक योजना, आदिवासी सार्वत्रीकरण योजना, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य योजना अंतर्गत कर्मचाऱ्यांचे वेतन हे मागील ५-६ महिन्यांपासून झाले नसल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांचे मागील ५-६ महिन्यांपासून थकीत असलेले कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या कर्मचऱ्यांच्या वेतनास विलंब होणार नाही याबाबत शासनाने कोणत्या उपययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन मे, २०२५ मध्ये अदा करणे बाकी होते. सदर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन ऑगस्ट, २०२५ मध्ये अदा करण्यात आलेले आहे.

आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत २ आश्रमशाळांमधील कार्यरत कर्मचाऱ्यांचे एप्रिल व मे, २०२५ महिन्याचे तसेच १ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे बाकी होते. सदर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन विलंबाने अदा करण्यात आलेले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेंतर्गत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे मे, २०२५ पर्यंत नियमितपणे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत अल्पसंख्यांक विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य व आदिवासी विकास विभागाच्या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांचे जानेवारी, २०२६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(२) व (३) उक्त योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे होण्याकरीता नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाकरीता क्षेत्रिय प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडे संबंधित जिल्ह्यातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येत असूनही बेरोजगारी वाढत असल्याबाबत

**(१५) ३९०८ (१८-०७-२०२५) श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे सूक्ष्म आणि लघुउद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळाव्याचे आयोजन करून रोजगार निर्मिती करणे, आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवणे, यासाठी तीन सामंजस्य करार कौशल्य उद्योजकता व नाविन्यता विभागाने बंगळूर येथील श्री ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बंगळूर, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन तसेच पुण्याची दि आसरा फाउंडेशन आणि अंधेरीतील प्रोजेक्ट, मुंबई या सामाजिक संस्थांमध्ये करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येत असतानाच वाढती बेरोजगारी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१) सदर प्रकरणी पूढीलप्रमाणे सामंजस्य करार करण्यात आले आहेत :- (i) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व श्री.श्री.रुलर डेव्हलमेंट प्रोग्रॅम ट्रस्ट (SSRDP) व Schneider Electric India Foundation, Banglore यांचेसमवेत दिनांक ५/०४/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सदर करारानुसार, ३ वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने २० शासकीय औ.प्र.संस्थामध्ये Advance Electrical प्रयोगशाळा उभारणे व एकूण ९७५० लक्ष्यित प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

(ii) सदरहू संचालनालय व Project Mumbai या सेवाभावी संस्था यांच्यामध्ये दिनांक १५/०४/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर करारानुसार, स्वातंत्र्यसैनिक जोसेफ (काका) बाप्टिस्ट शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथे सध्या सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक या व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये श्रवणदोष (Hearing-impaired (SHI)) उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

(iii) दि आसरा फाऊंडेशन यांच्याबरोबर महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी दिनांक ७/०४/२०२५ रोजी सामंजस्य करार केलेला आहे.
(२) व (३) उपरोक्त संस्थांसोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांतर्गत अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आल्यानंतर अत्याधुनिक व चांगल्या प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देऊन उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार होणार असल्याने बेरोजगारी दूर होण्यासाठी मदत होणार आहे.

तसेच राज्यातील बेरोजगारी दूर करण्यासाठी mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल विकसित करण्यात आले असून या माध्यमातून नोकरीइच्छूक उमेदवारांची नोंदणी केली जाते. तसेच मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेव्दारे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच बेरोजगार उमेदवारांकरीता वेळोवेळी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

---

## मुंबईतील शिक्षण निरीक्षक (उत्तर, पश्चिम व दक्षिण विभाग) कार्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ४७०५ (१७-१२-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शिक्षण निरीक्षक, उत्तर पश्चिम व दक्षिण विभाग कार्यालयामध्ये महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या शिक्षण उपनिरीक्षक, सहायक शिक्षण उपनिरीक्षक, अधीक्षक यांच्यासह वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, समादेशक तसेच शिपायांच्या ५० टक्याहून अधिक जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त जागा भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याप्रकरणी सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) दिनांक २४/०९/२०२५ व दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यात आलेली असून, त्याद्वारे मुंबईतील शिक्षण निरीक्षक कार्यालयांमध्ये ७ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेले एकूण १०९ परिविक्षाधीन अधिकारी सीपीटीपी १० व ११ अंतर्गत प्रशिक्षण घेत आहेत. सदर परिविक्षाधीन अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना नियमित पदभार/पदस्थापना देण्यात येणार आहे.

शिक्षण निरीक्षक (उत्तर, पश्चिम व दक्षिण विभाग) कार्यालयांमधील गट-अ व गट ब या संवर्गातील २६ पदे मंजूर असून, त्यापैकी १७ पदे कार्यरत आहेत. गट-अ व गट-ब संवर्गातील तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर येथील प्रि-आयएएस सेंटर इमारत व वसतिगृह उभारणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ४८७३ (१७-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे प्रि-आयएएस सेंटरची इमारत व वसतिगृह उभारणीसाठी सन २०१० मध्ये मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असून सदर कामास दिनांक २१ ऑक्टोबर २०१० मध्ये रुपये ४ कोटी ६२ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देवून इमारतीची कामे सुरु करण्यात आली असूनही निधी अभावी इमारत व वसतिगृहाची कामे बंद पडली आहे. तसेच इमारतीचे वाढीव काम करण्यासाठीवाढीव १३ कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून वसतिगृहाची किरकोळ कामे करण्याकरीता प्रशासनाने डीपीडीसी मधून रुपये दोन कोटीची केलेली मागणी अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रि-आयएएस सेंटर व वसतिगृहासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१८-०३-२०२६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०१० मध्ये छत्रपती संभाजीनगर येथील प्रि-आयएएस सेंटर इमारत व वसतिगृह उभारणीसाठी रुपये ४.६२ कोटी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदर इमारतींचे बहूतांश बांधकाम पूर्ण झालेले असून केवळ किरकोळ काम बाकी आहे, असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

इमारतींच्या बांधकामाच्या अनुषंगाने रुपये १३ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास प्राप्त झाला होता.तथापि, सदर इमारतीचे राहिलेले किरकोळ बांधकाम पूर्ण करुन वास्तु विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत उच्च शिक्षण विभागाकडून दिनांक ०४/१०/२०२२ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

संस्थेद्वारे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.तथापि, त्यास जिल्हा नियोजन समितीची मंजूरी प्राप्त झाली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) येथे उभारण्यात येणाऱ्या एकात्मिक संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१८) ४९०२ (१७-१२-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल जिल्हा रायगड येथे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि महाराष्ट्र भूषण डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने उभारण्यात येणाऱ्या एकात्मिक संकुलाच्या बांधकामाचे काम अपुर्णावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन राज्यपाल यांच्या हस्ते या संकुलाचे भूमिपूजन दिनांक २७ मार्च, २००३ रोजी होऊनही दोन वर्षांचा कालखंड झाला तरी अद्यापही या कामाला प्रत्यक्षात सुरुवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरच्या अपूर्णावस्थेत असलेल्या पनवेल आयटीआयचे एकात्मिक संकुलाचे काम कधीपर्यंत सुरू करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

उक्त प्रकल्पाचे भूमिपूजन झाले आहे.

तथापि, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ व महाराष्ट्र भुषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेलच्या संयुक्त संकुल इमारत बांधकामाकरीता, सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयीन यंत्रणा असून संयुक्त संकुल बांधकाम प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कौशल्यविकास प्रशिक्षण घेतलेल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत

**(१९) ५०१६ (१७-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात देशात तिसऱ्या क्रमांकावर असला तरी नोकरी देण्यात खूप मागे असून सन २०१५-१६ ते ३० जून, २०२५ पर्यंत राज्यात १३ लाख ३१ हजार ३८५ तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहेत. यातील फक्त ८० हजार ९५० तरुणानांच नोकरी मिळू शकली त्यामुळे राष्ट्रीय क्रमवारीत महाराष्ट्र ११ व्या स्थानी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने माहिती घेवून कौशल्यविकास अंतर्गत प्रशिक्षण घेऊनही अद्याप नोकरी न मिळालेल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१२-०३-२०२६) :** (१) विविध कौशल्य विकास योजनांतर्गत सन २०१५-१६ ते फेब्रुवारी, २०२६ पर्यंत राज्यात "महास्वयं" पोर्टलवर १२.१९ लक्ष उमेदवार नोंदणीकृत असून त्यापैकी ३.२६ लक्ष उमेदवारांना संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन

देण्यात आल्या आहेत.

(२) विविध कौशल्य विकास योजनांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच, कौशल्य विकास प्रशिक्षणानंतरही रोजगार न मिळालेल्या तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी महास्वयम् पोर्टलद्वारे Jobseeker म्हणून नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर उमेदवारांना कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत आयोजित रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांशी जोडण्याचे प्रयत्न केले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर यांचेकडील शिक्षक संघाच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२०) ५७८४ (२२-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी शाळा शिक्षक संघ, नागपूर, महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने दिनांक ४ ऑगस्ट, २०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले असून या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी (वि.प.स.) दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी खाजगी शाळा शिक्षक संघासोबत आंदोलनातील मागण्यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकारी यांच्या समवेत आंदोलन सुचनेवर चर्चा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार संघटनेच्या पदाधीकाऱ्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती काय असल्यास या बैठकीतील झालेल्या चर्चेनुसार व त्यावर घेतलेल्या निर्णयानुसार इतिवृत्त संघटनेला देण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) खाजगी शिक्षक संघटनेच्या पदाधिकारी यांच्या समवेत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर यांनी दिनांक १८/११/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये खाजगी शिक्षक संघटनेच्या पदाधिकारी यांच्या सर्व समस्या ऐकून घेण्यात आलेल्या असून संघटनेनी दिलेल्या सर्व मुद्यांची कार्यवाही प्रक्रियेमध्ये आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** | **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** | **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.